सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण

मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड, नाशिक - 422101
दुरध्वनी क्र. 0253-2461909 Email- kumbhmela.2027@mah.gov.in

जा.क्र.नात्रकुंप्रा/प्रा.बैठक / 262 /२०२५/ दिनांक. स्वाक्षरी खाली नमूद आहे.

प्रति,

मा.जिल्हाधिकारी, नाशिक
मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक
मा.जिल्हाधिकारी, आहिल्यानगर
मा.महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
मा.पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण.
मा.आयुक्त, महानगरपालिका, नाशिक.
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.
मा.मुख्यधिकारी त्र्यंबक नगरपरिषद
मा.उपायुक्त (नियोजन ) नाशिक
मा.विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक
मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक.
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, देवळाली कंन्टोंमेंट, नाशिक.
मा.अधिक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक.
मा.मुख्य अभियंता , सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
मा.मुख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक.
मा.अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण.
मा.प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक.
मा.सह संचालक,लेखा व कोषागार विभाग, नाशिक
मा.सह संचालक,नगर रचना विभाग, नाशिक
मा.रेल्वे मंडळाचे प्रतिनिधी
मा.कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक.
मा.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक.
मा.जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक.
मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक
मा.सहायक संचालक, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग, नाशिक.
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, NMSCDCL

**विषय:** नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या दिनांक १३/१२/२०२५ रोजी मा. अध्यक्षतेखाली झालेल्या सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सिंहस्थ कुंभमेळा २०२७ कुंभमेळा प्राधिकरणाच्या दि. १३/१२/२०२५ मा. अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत असून मा. अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक महोदय यांचे सूचनेनुसार सदर इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

Signed by Yogendra Ashok Chaudhari
Date: 16-12-2025 12:50:06

(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त (नियोजन),
नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण,
नाशिक

**नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा दिनांक १३/१२/२०२५रोजी झालेल्या कुंभमेळा प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त.**

दिनांक १३/१२/२०२५ रोजी डॉ.प्रविण गेडाम, अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा व प्राधिकरणाची बैठक घेण्यात आली. बैठकीत उपस्थितांची यादी सोबत संलग्न आहे. कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव यांनी सर्व प्राधिकरण सदस्यांचे स्वागत केले आणि बैठकीस सुरुवात झाली.

**विषय क्र. १ :-** दि. २५/११/२०२५ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे —

दि. २५/११/२०२५ रोजी घेण्यात आलेल्या प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

त्यानंतर विषय पत्रिकेवरील इतर विषयांवर चर्चा सुरू होण्यापुर्वी अध्यक्षांनी नमुद केले की, यापुर्वी देखील विषयसुचीवरील विषयांबाबत सविस्तर माहिती डॉकेटमध्ये देण्यात यावी, अशा सुचना देण्यात आल्या होत्या. तथापि, यंदाही अशी माहिती उपलब्ध न करून देता विषय पत्रिकेवर विषय घेण्यात आले आहेत. तरी यापुढे परिपूर्ण माहितीच्या आधारे डॉकेट तयार करून बैठकीपुर्वी पुरेसा कालावधी देऊन सर्व सदस्यांना ते वितरित करावे. जेणेकरून सर्वांना याबाबत अभ्यास करून प्राधिकरणाच्या बैठकीत येता येईल.

**विषय क्र. २ :-** सिंहस्थ कुंभमेळा २०२७ साठी भाडेतत्वावर अधिग्रहीत करावयाच्या जमीनींसाठी सल्लागार नेमणुक करणे —

आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांच्या पत्र दि. २० नोव्हेंबर २०२५ नुसार सिंहस्थ कुंभमेळा २०२७ करीता साधुग्राम, वाहनतळे, निवारा शेड इ. सुविधांसाठी नाशिक शहरात ८०० एकर, त्र्यंबकेश्वर येथे २१९ एकर असे एकुण क्षेत्र भाडेतत्वावर अधिग्रहीत करण्यासाठी जमिनीचे सर्वेक्षण आणि अनुषंगिक कामे करण्यासाठी सल्लागार सर्वेक्षक नेमणुकीची विनंती करण्यात आली आहे. त्याला प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती बैठकीत देण्यात आली. यावेळी अध्यक्षांनी २०१५ मध्ये झालेल्या कुंभमेळ्याबाबत अशा पध्दतीच्या कामासाठी झालेला खर्च, सध्या प्राप्त झालेले प्रति हेक्टरी दर, अस्तित्वातील करारनाम्यातील प्रति हेक्टरी दर याबाबतची माहिती विचारली असता ती उपलब्ध झाली नाही.

तथापि, आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी असे सांगितले की, निविदा जाहीर करून प्राप्त झालेले दर हे बरेच कमी आहेत. यावर अध्यक्षांनी सुचित केले की, साधारणत: प्रशासकीय मान्यता घेण्यापुर्वी पुढील प्रक्रिया करू नयेत, असे अपेक्षित आहेत. याबाबत यानंतर त्यांनी काळजी घ्यावी. याबाबत सहसंचालक, नगररचना आणि सहसंचालक, लेखा व कोषागारे यांना त्यांचे मत व्यक्त करण्यास सांगितले असता, त्यांनी पुरेशा माहिती अभावी मत व्यक्त करता येणार नाही, असे सूचित केले. तथापि, कुंभमेळा आयुक्त यांनी सदरबाबत त्यांनी पुर्ण तपासणी केली असून प्राप्त झालेले दर उचित असल्याबाबत त्यांनी समाधान केले आहे, असे नमूद केले. त्याचप्रमाणे निवडणुकीची आदर्श आचारसंहिता कधीही लागू शकत असल्यामुळे त्वरित याला मान्यता देणे आवश्यक आहे, असेही नमुद केले. आयुक्त, महानगरपालिका यांनी सांगितले की, L-१ प्राप्त झालेल्यांना अधिकाधिक काम देऊन उर्वरितांना देखील पॅनलवर घेण्यात येणार आहे. तथापि, त्यांना नक्की किती टक्के काम उपलब्ध करून देण्यात येणार आहे, ही माहिती उपलब्ध झाली नाही. याबाबत पुरेशी माहिती उपलब्ध नसल्याने, तथापि आचारसंहिता कोणत्याही दिवशी लागण्याची शक्यता पाहता आणि कुंभमेळ्याच्या कामाची तातडी पाहता, सदर कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात यावी आणि

प्रत्यक्षात तसा आदेश पारित करण्यापुर्वी सहसंचालक, नगररचना आणि सहसंचालक, लेखा व कोषागारे यांनी एकदा प्रक्रियेची आणि दराची खात्री करून घ्यावी आणि त्यानंतर कुंभमेळा आयुक्त यांनी सध्या नाशिक शहरापुरते प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करावे, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३ :-** नाशिक महानगरपालिका आरोग्य विभागाच्या अत्यावश्यक कामांसाठी प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धता –

आयुक्त तथा प्रशासक, नाशिक महानगरपालिका यांनी पत्र दि. ०१/१२/२०२५ नुसार सार्वजनिक आरोग्य सुविधांसाठी रू. ८४.३० कोटी रूपयांच्या कामांच्या आराखड्याची मागणी केली असून त्यात तपोवन रूग्णालयाचे नुतनीकरण (बांधकाम व साधन सामग्रीसाठी) रू. ८.१६ कोटी आणि इंदिरा गांधी रूग्णालयाचे नुतनीकरण (बांधकाम व विद्युत व्यवस्था) रू. ६.०० कोटी असे रू. १४.१६ कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यासाठी विनंती केली. तसेच त्यांनी असेही नमुद केले की, याला जर आता प्रशासकीय मान्यता देण्यात आली नाही तरी ही कामे कदाचित वेळेवर पुर्ण होऊ शकणार नाहीत. सदर कामांची निकड असल्याची खात्री प्राधिकरणाचे सदस्य, उपसंचालक, आरोग्य यांनी व्यक्त केली. तथापि, सदर काम शासनाचे पत्र दि.२९/०८/२०२५ द्वारे नमुद केलेले रू. ५१४०.०१ कोटीचे कामांमध्ये अंतर्भुत नसल्यामुळे आणि या प्रकियेला शासनाकडून कार्योत्तर मान्यता घ्यावी लागेल, असे अध्यक्षांनी नमुद केले. त्यानुसार सदर कामांना प्रशासकीय मान्यता द्यावी, असे सर्वानुमते ठरले.

त्याचप्रमाणे अध्यक्ष यांनी याबाबत नमुद केले की, मा. मुख्य सचिव यांनी यापुर्वी बैठकीत दिलेल्या सुचनेनुसार कुंभमेळा आराखड्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावा आणि त्याला विहित प्रक्रियेनुसार यथाशीघ्र मान्यता घ्यावी.

**विषय क्र. ४ :-** पोलीस विभागाच्या (नाशिक शहर व ग्रामीण) प्रस्तावित कामांच्या आराखड्यास अंतिम मान्यता –

पोलीस विभागाचे कामांबाबत मा. अपर मुख्य सचिव (गृह) यांनी बैठकीत ठरविल्यानुसार पोलिस आयुक्त, नाशिक शहर यांचा रू. ३६४ कोटी आणि पोलिस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांचा रू. ४१५ कोटी असा आराखडा तयार करण्यात आल्याचे आयुक्त, कुंभमेळा यांनी सांगितले. त्यावर सदर कामाची यंत्रणा कोणती असावी, याबाबतचा निर्णय पोलिस आयुक्त आणि पोलिस अधीक्षक यांनी घ्यावा. त्यावर त्या आराखड्याची प्राधिकरणाने नोंद घेतली आणि त्या कामाची कार्यान्वयीन यंत्रणा कोण राहील याबाबतचा निर्णय पोलिस आयुक्त आणि पोलिस अधीक्षक यांनी घ्यावा, असे ठरले.

**विषय क्र. ५ :-** कुंभमेळा प्राधिकरण (जिल्हा परीषद जुनी इमारत) कार्यालयाचे नुतनीकरण –

जिल्हा परीषद, नाशिकच्या विद्यमान इमारतीचे नुतनीकरण व फर्निचर पुरवठा याबाबत रू. ३ कोटी रूपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्याला मान्यता देण्यासाठी विषय प्राधिकरणासमोर सादर करण्यात आला. सहसंचालक, लेखा व कोषागारे यांनी असे नमुद केले की, सदर प्रस्ताव रू. ३.४९ कोटी इतका आहे आणि त्याला मान्यता देण्यात यावी. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनीदेखील सदर प्रस्तावास अनुमोदन दर्शविले. त्यानुसार प्राधिकरणाने रू. ३.४९ कोटींच्या कामांसाठी प्रशासकीय मान्यता दिली.

**विषय क्र. ६ :-** गोदावरी नदीकाठावरील ग्रीनबेल्ट क्षेत्रात नवीन घाट तयार करण्यासाठी भुसंपादन -—

मुख्याधिकारी, त्रिंबक नगरपालिका, त्र्यंबकेश्वर यांनी दि. १०/१२/२०२५ च्या पत्राद्वारे श्री. चंद्रघाट ते प्रयागतीर्थ पर्यंत गोदावरी नदीकिनारी नविन घाट तयार करण्यासाठी दोन्ही बाजुंना ३० मीटर ग्रीनबेल्ट क्षेत्रामध्ये भुसंपादनासाठी रू. ५.०७ कोटी निधीची मागणी करण्यात आली आहे. त्यास प्रशासकीय मान्यता देण्यासाठी विनंती करण्यात आली. त्यावेळी आधीचा प्रस्ताव स्पष्ट सुचना देऊनही अर्धवट प्राप्त झाला होता, याबाबत अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली. तथापि, मा. राज्य निवडणुक आयोग यांनी या कामासाठी आचारसंहितेतून दिलेली सुट पाहता आणि कामांची तातडीची निकड पाहता या कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. ७ :-** कुंभमेळा कामांच्या गुणवत्ता तपासणीसाठी विशेष तज्ञांची नेमणुक करणेबाबत —

कुंभमेळा निमित्त सुरू असलेल्या विविध कामांची गुणवत्ता तपासणी, आपत्ती व्यवस्थापन तसेच इतर विभागांसाठी विशेष तज्ञ नेमणुकीच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कुंभमेळा आयुक्त यांनी प्रस्तावित केले की, नावाजलेल्या शासकीय, शैक्षणिक संस्थांमधील प्राध्यापक व त्याप्रकारच्या तज्ञांना नेमणुकीसाठी मान्यता द्यावी. याबाबत सविस्तर चर्चा झाली आणि केंद्र किंवा राज्य शासनाच्या अभियांत्रिकी स्वरूपाची कामे करणाऱ्या यंत्रणांच्या कार्यपध्दतीची माहिती घेऊन त्यानुसार नेमणुका कुंभमेळा आयुक्त यांनी कराव्यात, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ८ :-** लक्ष्मीनारायण घाटाची लांबी ४० मीटरने वाढविणेबाबतच्या कामास मान्यता देणे —

लक्ष्मीनारायण घाटाची लांबी वाढवून ती पुलाखालून नेऊन तपोवन बाजुच्या घाटाला जोडणे आवश्यक असल्याचे कारण नमुद करत महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाने ४० मीटर लांबी वाढविण्यासाठी रू. २८.७८ कोटीच्या वाढीव प्रशासकीय मान्यता देण्यासाठी विनंती केली आहे. त्यानुसार सदर कामाची रक्कम वाढवून त्याला नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. ९ :-** मौजे चांदशी ते जलालपुर येथील मल:निस्सारण व्यवस्था (Interception and Diversion System) —

मौजे चांदशी आणि मौजे जलालपुर येथील Interception आणि Drainage च्या कामांसाठी २.२४ एम.एल.डी. क्षमतेचे रू. २.०४ कोटी आणि जलालपुरच्या १.७४ एम.एल.डी. साठी रू. १.७४ कोटी अशा कामांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यासाठी महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा प्रस्ताव प्राप्त झाला असून त्याला प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती करण्यात आली. त्यावेळी महानगर आयुक्त यांनी सांगितले की, प्रत्यक्षात अनुक्रमे रक्कम रू. २.८४ कोटी आणि २.१७ कोटी असून एकुण रू. ५.०१ कोटीसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. त्यावर सविस्तर चर्चा होऊन सदर कामांसाठी प्रशासकीय मान्यता देण्याचे ठरले.

**विषय क्र. १० :-** आयत्या वेळचे विषय —

याशिवाय आयत्या वेळचे ४ विषय असल्याचे कुंभमेळा आयुक्त यांनी नमुद केले ते पुढीलप्रमाणे :--

१) नाशिकच्या वळण रस्त्यासाठी (रिंग रोडसाठी) आवश्यक भुसंपादनाकरीता ३ उपअधीक्षक, भूमि अभिलेख यांचे कार्यालयाकडे एकंदरीत रू. २.२३ कोटी मोजणी फी महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाने जमा करणे आवश्यक असल्याचे आयुक्त, कुंभमेळा यांनी नमुद केले. त्याला मान्यता देण्याची विनंती केली. त्यास प्राधिकरणाने प्रशासकीय मान्यता दिली.

२) आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी नाशिक शहरातील ३ आराखड्यांसाठी प्रत्येकी १ कोटी रूपयांपर्यंत असे एकंदरीत ३ कोटी रूपयांची तात्पुरती बांधकामे, स्वच्छतागृहे, दुरूस्त्या अशा स्वरूपाची कामे करण्यासाठी त्वरीत निविदा प्रसिध्द करणे आवश्यक आहे आणि त्याकरीता मान्यता द्यावी, अशी विनंती केली. याबाबत आखाडानिहाय सविस्तर माहिती उपलब्ध नव्हती. तथापि, सदर कामांची आचारसंहितेपुर्वी मान्यता देणे आवश्यक असल्याचे नमुद केल्यामुळे याला प्रशासकीय मान्यता देण्यात यावी, अशी आयुक्त यांनी विनंती केली. ती पाहता सदर बाबीसाठी मान्यता देण्यात आली.

३) कुंभमेळा आयुक्त यांनी असे नमुद केले की, त्यांचे नाशिक येथील निवासस्थानासाठी रू. १ लक्ष प्रति महिनापर्यंत भाडे देऊन खाजगी निवासस्थान घेण्यासाठी मान्यता देण्याची विनंती केली. तसेच त्यावर दरवर्षी ५ टक्के प्रमाणे वाढ करण्याची परवानगी मागितली. याबाबत त्यांनी जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता यांचे शासकीय निवासस्थानाची दुरूस्ती करण्यास वेळ लागणार असल्यामुळे त्याचप्रमाणे आधी निवास वाटप समितीतर्फे वाटप झालेले दुसरे 'जेतवन' निवासस्थान सुयोग्य नसल्याने सदर प्रस्तावास मान्यता देण्याची विनंती केली. तथापि, याबाबत घरभाडे भत्ता (House Rent Allowance) चा मुद्दा पाहता याबाबतचा निर्णय शासन स्तरावर घेणे योग्य राहील, असे प्राधिकरणात ठरले.

४) राज्य पुरातत्व विभागामार्फत नारो शंकर मंदिराचे कामाला रू. ३.७८ कोटीच्या मर्यादेत प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि, प्राप्त निविदा पाहता यासाठी रू. ३.९१ कोटी खर्च अपेक्षित आहे. तरी त्याला सुधारीत प्रशासकीय मान्यता द्यावी, अशी विनंती केली असता त्यानुसार सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला.

वर प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांपैकी जी कामे शासनाचे पत्र दिनांक २९/०८/२०२५ मध्ये नमुद नाही आणि / किंवा रू. ५१४०.०१ च्या मान्यतेच्या पलीकडे आहे त्या सर्व कामांबाबत नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अधिनियम २०२५ मधील तरतुदीनुसार शासनाची मान्यता घ्यावी लागेल. त्यादृष्टीने कुंभमेळा आयुक्तांनी पुढील उचित कार्यवाही करावी, असे अध्यक्षांनी निर्देशीत केले.

सरतेशेवटी अध्यक्षांनी पुन्हा एकदा नमुद केले की, प्राधिकरणासमोर विषय ठेवत असतांना त्याची पुरेशी माहिती डॉकेटच्या स्वरूपात पुरेसा कालावधी देऊन सर्व सदस्यांना सादर करावी. त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार इतर माहिती जसे की, नकाशे, आराखडे इ. सादरीकरणाद्वारे सादर करावे. जेणेकरून यावर नीट विचार करून निर्णय घेता येईल. घाईघाईने विषय आणू नयेत. अशा सुचना दिल्या. कुंभमेळा आयुक्त यांनी सर्वांचे आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली.

**Signed by Praveen Nilkanthrao Gedam**
**Date: 15-12-2025 14:20:11**

(डॉ. प्रवीण गेडाम)
अध्यक्ष, नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा
विभागीय आयुक्त, नाशिक

बैठकीस उपस्थितांची यादी

| | |
|---|---|
| १ | जिल्हाधिकारी, नाशिक. |
| २ | विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक |
| ३ | जिल्हाधिकारी, आहिल्यानगर |
| ४ | महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक. |
| ५ | पोलीस आयुक्त, नाशिक शहर. (यांचे प्रतिनिधी ) |
| ६ | पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण. |
| ७ | आयुक्त, महानगरपालिका, नाशिक. |
| ८ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक. |
| ९ | मुख्यधिकारी त्र्यंबक नगरपरिषद |
| १० | उपायुक्त (नियोजन ) नाशिक |
| ११ | विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक |
| १२ | उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक. (यांचे प्रतिनिधी ) |
| १३ | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, देवळाली कंन्टोंमेंट, नाशिक. |
| १४ | अधिक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक. |
| १५ | मुख्य अभियंता , सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक. |
| १६ | मुख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक. |
| १७ | अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण. |
| १८ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक. (यांचे प्रतिनिधी ) |
| १९ | सह संचालक,लेखा व कोषागार विभाग, नाशिक |
| २० | सह संचालक,नगर रचना विभाग, नाशिक |
| २१ | रेल्वे मंडळाचे प्रतिनिधी |
| २२ | कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक. |
| २३ | जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक. |
| २४ | जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक. (यांचे प्रतिनिधी ) |
| २५ | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक |
| २६ | सहायक संचालक, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग, नाशिक. |
| २७ | मुख्य कार्यकारी अधिकारी, NMSCDCL. |